## प्रेसनोट

जा.क्र. १८४ /माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस उप अधिक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक :— १०/०४/२०१८

### ''पत्नीस जाळुन खुन करणाऱ्या आरोपीस आजन्म सश्रम कारावास व द्रव्यदंडाची शिक्षा''

पोलीस ठाणे कारधा अंतर्गत ग्राम पलाडी येथिल आरोपी नामे सुदेश मंगरू राउत, वय ४५ वर्ष, रा. पलाडी, ता. जिल्हा भंडारा यास स्वत:चे पत्नीचे अंगावर मातीचे तेल टाकुन जाळुन खुन केल्याचे आरोप सिध्द झाल्याने आज दिनांक १०.०४.२०१८ रोजी जिल्हा व सत्र न्यायालय भंडारा चे अतिरीक्त सत्र न्यायाधिश श्री. आर. पी. पांडे सा. यांनी आरोपीस आजन्म सश्रम कारावास व ५०००/— रूपये द्रव्यंडाची शिक्षा सुनावली.

याबाबत अधिक माहिती अशी की, दिनांक २.११.२०१५ ला तक्रारदार सौ. पंचफुला दसाराम चामलाटे, वय ५५ वर्ष रा. पलाडी यांनी पोलीस ठाणे कारधा येथे तक्रार दिली की, मुलगी नामे मालु हिचे १० वर्षा पुर्वी गावातीलच राहणारा सुदेश मंगरू राउत याचे सोबत विवाह झाला होता. विवाहानंतर सुदेश मंगरू राउत याचे पासुन मुलगी मालु हिस ९ वर्षाची मुलगी व ६ वर्षाचा मुलगा आहे. जावाई सुदेश मंगरू राउत हा छोटया छोटया कारणावरून वाद करून मारपीठ करीत होता. दिनांक २.११.२०१५ चे सायंकाळी ६.३० वा. दरम्यान तक्रारदार घरी हजर असतांना नातु नामे रिंकु हा रडत रडत आला व सांगीतले की, वडीलांनी आईला पेटविले आहे यावरून तक्रारदार हया नातवा सोबत मुलगी मालु हिचे घराकडे जात असतांना गावातील लोकांनी सांगीतले की, सुदेश राउत याने आपले पत्नीस जाळले आहे. तक्रारदार मुलगी मालु हिचे घरी गेली असता घराचे समोरच्या छपरीत मालु हिचे अंगावरील कपडे हात, पाय, चेहरा, पोटाचा भाग जळुन शरीर मृत अवस्तेत होते. मुलगी मालु हिचे अंगावर जावाई आरोपी नामे सुदेश मंगरू राउत, वय ४५ वर्ष, रा. पलाडी याने घरगुती कारणावरून मातीचे तेल टाकुन माचीसचे काडीने आग लावुन जाडुन मारले आहे अशा खबरेवरून आरोपी विरूध्द अपराध क्र. ९५/१५ कलम ३०२ भादवि अन्वये गुन्हा नोंद केला.

सदर गुन्हयाचा तपास सहा. पोलीस निरीक्षक, विनोद रहांगडाले यांनी करून गुन्हयातील **आरोपी नामे सुदेश मंगरू राउत, वय ४५ वर्ष, रा. पलाडी, जिल्हा भंडारा यास** अटक करून गुन्हयाचा तपास केला. तपासात आरोपी विरूध्द पुरावे प्राप्त झाल्याने आरोपी विरूध्द गुन्हयात कलम ३०२ भादवि अन्वये आरोप पत्र तयार करून सत्र न्यायालय, भंडारा येथे दाखल केले. सदर आरोपपत्रास केस क्र. ४/१६ अन्यवे अतिरीक्त सत्र न्यायाधिश सा. यांचे समक्ष सुनावणी करीता ठेवण्यात आले.

सदर गुन्हयाची सुनावणी **मा. अतिरीक्त सत्र न्यायाधिश श्री. आर. पी. पांडे सा.** यांचे समक्ष चालली गुन्हयात सरकार पक्षातर्फे **ॲडव्होकेट श्री. विश्वास तवले, सहा. सरकारी अभियोक्ता**, सत्र न्यायालय भंडारा यांनी योग्य बाजु मांडुन साक्षदार तपासले. आज दिनांक १०.०४.२०१८ रोजी गुन्हयाचे स्वरूप व गंभिरता लक्षात घेवुन **आरोपी नामे सुदेश मंगरू राउत, वय ४५ वर्ष, रा. पलाडी, ता. जिल्हा भंडारा** यांचे विरूध्द दोषसिध्द झाल्याने **कलम ३०२ भादवि अन्वये आजन्म सश्रम कारावास व ५०००/— रूपये दंड, दंड न भरल्यास ६ महिणे कारावास अशी शिक्षा सुनावण्यात आली.** सदर गुन्हयात पोलीस निरीक्षक, रविंद्र मानकर, ठाणेदार पोलीस ठाणे कारधा यांचे मार्गदर्शनात पोलीस हवालदार, सिताराम ब्राम्हणकर/७१ पो. स्टे. कारधा यांनी योग्य पैरवी अधिकारी म्हणुन कामकाज केले.

**महाराष्ट्र पोलीस दल, जिल्हा भंडारा तसेच सरकारी अभियोक्ता वर्ग जिल्हा व सत्र न्यायालय भंडारा तर्फे जनतेस निर्भीड पणे गुन्हयाचे दोषसिध्दी करीता व महिलांवरील अत्याचार रोखण्याकरीता पोलीसांना पंच व साक्षदार म्हणुन सहकार्य करण्याचे जाहिर आवाहन करण्यात येत आहे.**

(एस. आर. तेलुरे)
जि.वि.शा.भंडारा
दुरध्वनी क्र.९९२१२५३५४९

**प्रति,**

**जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा**

वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

**प्रत:** संगणक कक्ष, भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.